# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## स्थायी समिती च्या सभापती पदाच्या निवडणुकीची विशेष 2014

मंगळवार दिनांक 09.12.2014 रोजी सकाळी 11.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर निवड करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, नांदेड तथा पिठासीन अधिकारी मा. श्री धीरजकुमार यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची विशेष सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहामध्ये भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स्थायी समितीचा सदस्य उपस्थित होते .

सर्व श्रीमती/ सौ.

1 अन्नेवार गंगासागर संदिप
2 मोरे संजय गंगाधर
3 इंदूबाई शिवाजीराव घोगरे
4 प्रविण बालाप्रसाद बियाणी
5 विनयकुमार जगदिश गुर्रम
6 संगिता पृथ्वीराज राओत्रे
7 ज्योती महेद्र खेडकर
8 सलिमा बेगम नुरुल्ला खान
9 विनय विश्वांबरराव पाटील
10 पवळे उमेश देवराव
11 वाजेदा तब्बसुम अथर उल ईमान
12 गाडगे शंकर जयवंतराव
13 चाऊस हसीना बेगम साबेर
14 किशोर किशनलाल यादव,
15 अ.हबीब अ.रहिम बागवान
16 बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला

**विषय क्र .1 :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 (1) व शासन अधिसुचना क्र . बिएनएम/5007/प्रक्र.15/नवि-32 दिनांक 17 फेब्रुवारी 2007 व शासन अधिसुचना क्र .बिएनएम/2008/ 295/प्रक.106/2008/नवि-32 दिनांक 12 डिसेंबर 2008 मधील नियम 4 (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणुक घेणे (मधील तरतुदीनुसार स्थायी समितीच्या निर्वाचीत (16) सदस्यांमधून स्थायी समितीच्या सभापतीची निवड करणे.

**नगरसचिव** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 (1) आणि स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे (नियम, 2007 चे नियम 2(2) चे सुधारीत तरतुदी प्रमाणे मा .विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेशी विचार विनिमय केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्याकरीता या समितीची विशेष सभा घेण्यासाठी दिनांक 09.12.2014 ही तारीख निश्चित करण्यात आली .स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे सुधारीत नियम, 2008 चे नियम 4 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा. विभागीय आयुक्त यांनी आजच्या स्थायी समितीच्या विशेष सभेसाठी आ.क्र.2014/साप्र/कक्ष-4/नपाप्र/आस्था/ कावि/दि.03.12.2014 अन्वये त्यांचे प्रतिनिधी म्हणून

श्री धीरजकुमार, जिल्हाधिकारी, नांदेड यांना पिठासिन अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे .

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 (1) आणि महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 5007 मधील तरतूदीनूसार स्थायी समितीच्या सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दि.4.12.2014 रोजी निवडणूक कार्यक्रमासह सभेची नोटीस निर्गमित करण्यात आली होती. त्यानुसार दि. 08.12.2014 पर्यंत नामनिर्देशनपत्र वाटप करणे व स्विकारण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून निर्दिष्ट कालावधीत म्हणजे दिनांक 8.12.2014 रोजी दुपारी 3.00 वाजे पर्यंत स्थायी समिती सभापती पदासाठी **श्री विनयकूमार जगदिश गूर्रम** व **श्री विनय विश्वांबरराव पाटील** या दोन उमेदवाराचे दोन नामनिर्देशनपत्रे प्राप्त झालीं असून ते छाननीसाठी मा. प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

**प्राधिकृत अधिकारी** स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे नियम, 5007 चे नियम क्र. 5 अन्वये स्थायी समितीच्या सभापती पदासाठी **श्री विनयकूमार जगदिश गूर्रम यांचा एक** व **श्री विनय विश्वांबरराव पाटील यांचे तीन** असे **एकूण चार नामनिर्देशनपत्रे** प्राप्त झालीं असून या चारही नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येत आहे **श्री विनयकूमार जगदिश गूर्रम** यांचे एका नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणून ज्योती महेंद्र खेडकर व अनुमोदक म्हणून राओत्रे संगिता पृथ्वीराज तर **श्री विनय विश्वांबरराव पाटील** यांचे एका नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून मोरे संजय गंगाधर व अनुमोदक म्हणून घोगरे इंदूबाई शिवाजी हे आहेत व दुस-या नामनिर्देशन पत्रावर श्री गाडगे शंकर जयवंतराव व अनुमोदक म्हणून श्री मोरे संजय गंगाधर हे आहेत व तिस-या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणुन आनेवार गंगासादर संदिप अनुमोदक म्हणून चाऊस हसीना बेगम साबेर या चारही नामनिर्देशन पत्रावर उमेदवारांच्या व त्यांच्या सूचक व अनुमोदकांच्या स्वाक्ष-या असल्यामूळे **श्री विनयकूमार जगदिश गूर्रम** व **श्री विनय विश्वांबरराव पाटील** या दोन्ही उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे वैध ठरली आहे, घोषित करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानूसार वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांना आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल तर त्यांना उमेदवारी परत घेण्यासाठी 15 मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. म्हणजेच 11.10 ते 11.25 वाजे पर्यंत आपली उमेदवारी परत घेता येईल.

**प्राधिकृत अधिकारी** विहित कालावधीत कोणीही उमेदवारी परत घेतलेली नसल्यामूळे मतदान घेवून सभापतीची निवड करण्यात येईल. सभापती पदासाठी निवडणूक लढविणा-या उमेदवाराची नांवे प्राप्त नामनिर्देशना वरील नांवाच्या वर्णानुक्रमाने लावण्यात आलेली असून ती खालील प्रमाणे आहेत.

**विनय विश्वांबरराव पाटील**

**विनयकुमार जगदिश गुर्रम**

**प्राधिकृत अधिकारी** मुंबई प्रातिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे ) नियम 2007 मधील नियम 6 (3) च्या तरतूदीनूसार हात वर करुन मताची नोंद घेण्यात येईल. नगरसचिवानी मतदान प्रक्रिया संबंधीची माहिती सभागृहात द्यावी.

**नगरसचिव**

1) मा.पिठासीन अधिकारी उमेदवाराचे नांव वर्णानुक्रमाने घोषित करतील ज्या उमेदवाराचे नांव पुकारण्यात येईल त्याचेसाठी प्रथम हात वर करुन मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मताची नोंद घेण्यात येईल. व त्यानी ज्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले आहे अशा पालिका सदस्याचे नांवाची नोंद कार्यवृत्तात नोंदविण्यात येईल.

1) मत देण्यास इच्छूक असलेल्या पालिका सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा.पिठासिन अधिकारी देतील.

2) ज्याचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे अशा पालिका सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

3) ज्या पालिका सदस्यानी मतदान केलेले नाही त्याची नोंद देखील कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.

4) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषित करतील की निवडणूकीचा निकाल चिठया टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठठी काढण्यात येईल.

5) ज्या उमेदवाराचे नांवाची चिठठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पिठासीन अधिकारी घोषित करतील

**प्राधिकृत अधिकारी**

आता वर्णानुक्रमाने उमेदवाराचे नांव घोषित करण्यात येतील.

1) विनय विश्वांबरराव पाटील

2) विनयकुमार जगदिश गुर्रम

प्रथम वर्णनुक्रमानुसार विनय विश्वांबरराव पाटील यांना ज्यांना मते द्यावयाची आहे त्यांनी विनय विश्वांबरराव पाटील यांना मत दिल्याबध्दल कानाच्या लगत आकाशाकडे उंच हात वर करुन आपले मत नोंदवावे.

सर्वश्री / श्रीमती.

1 अन्नेवार गंगासागर संदिप
2 मोरे संजय गंगाधर
3 इंदूबाई शिवाजीराव घोगरे
4 प्रविण बालाप्रसाद बियाणी
5 विनय विश्वांबरराव पाटील
6 पवळे उमेश देवराव
7 वाजेदा तब्बसुम अथर उल ईमान
8 गाडगे शंकर जयवंतराव
9 चाऊस हसीना बेगम साबेर
10 किशोर किशनलाल यादव,

त्यानुसार खालील स.सदस्यांनी हात वर करुन व रजिस्टरमध्ये स्वाक्षरी करुन या स. सदस्यंनी हात वर करुन आपले मत नोंदविले आहे.

विनयकुमार जगदिश गुर्रम यांना ज्यांना मते द्यावयाची आहे त्यांनी विनयकुमार जगदिश गुर्रम यांना मत दिल्याबध्दल कानाच्या लगत आकाशाकडे उंच हात वर करुन आपले मत नोंदवावे.

सर्वश्री / श्रीमती.

1 विनयकुमार जगदिश गुर्रम

2 संगिता पृथ्वीराज राओत्रे

3 ज्योती महेद्र खेडकर

या स. सदस्यंनी हात वर करुन आपले मत नोंदविले आहे.

1 श्रीमती सलिमा बेगम नुरुल्ला खान

2 अ.हबीब अ.रहिम बागवान

3 बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला

या सदस्यांनी मतदानात भाग घेतला नाही

**प्राधिकृत अधिकारी** मतदानाची प्रक्रिया पुर्ण झालेली आहे.

| | |
|---|---|
| स्थायी समिती मतदार सदस्यांची संख्या | 16 |
| मतदानात भाग घेतलेल्या पालिका सदस्याची संख्या | 13 |
| मतदानात भाग न घेतलेल्या सदस्यांची संख्या | 03 |

उमेदवाराना मिळालेली मते

| | |
|---|---|
| **विनय विश्वांबरराव पाटील** | 10 |
| **विनयकुमार जगदिश गुर्रम** | 03 |

झालेल्या मतदानात सभापती पदासाठी श्री **विनय विश्वांबरराव पाटील** यांना सर्वात जास्त मते मिळालेली असल्यामूळे स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे नियम 2007 मधील नियम (7) नूसार त्याची स्थायी समिती सभापती पदावर वैध रीतीने निवड झाल्याचे निवड झाल्याचे मी धीरकुमार पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड घोषीत करतो. व आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

**स्वाक्षरीत/-**

**पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी नांदेड,**
सभापती स्थायी समिती निवडणूक 2014
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड